# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१

जा. क्र. मनपा/सा.प्र.वि.२०५/२०२०-२१ दिनांक :- १५/२/२०२१

## ।। परिपत्रक ।।

प्रतिवर्षाप्रमाणे शासकीय परिपत्रकाप्रमाणे **शुक्रवार दि. १९ फेब्रुवारी २०२१ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती** साजरी करण्यात येणार आहे. त्यानिमित्त प्रतिवर्षाप्रमाणे महानगरपालिका मुख्य कार्यालय, दुसरा माळा येथे सकाळी ११.०० वाजता **मा.सौ. ज्योत्स्ना जालिंदर हसनाळे, महापौर,** यांच्या शुभहस्ते मा.आयुक्त डॉ. विजय राठोड, मा.उप-महापौर श्री. हसमुख गहलोत, मा.स्थायी समिती सभापती श्री. अशोक तिवारी, मा.सभागृह नेता श्री. प्रशांत दळवी, मा.विरोधी पक्ष नेता श्री.प्रविण मोरेश्वर पाटील, मा.सभापती परिवहन समिती श्री. दिलीप रुपचंद्र जैन, मा.सभापती महिला व बालकल्याण समिती श्रीम. वंदना मंगेश पाटील, मा.उपसभापती, महिला व बालकल्याण समिती श्रीम. सुनिता शशिकांत भोईर,मा.सर्व गटनेते/गटनेत्या, मा.सभापती प्रभाग समिती क्र.१ ते ६, मा.नगरसेवक / नगरसेविका सर्व, मा.अतिरिक्त आयुक्त सो., उप-आयुक्त (सर्व) व अधिकारी / कर्मचारी यांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचा कार्यक्रम संपन्न होणार आहे. त्यानिमित्त सकाळी ०९.०० वा. काशिमिरा येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचे अश्वारुढ पुतळयास, एम.टी.एन.एल. भाईंदर (प.) समोर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळयांस सकाळी ०९.३० वाजता पुष्पहार अर्पण करणे. तदनंतर महानगरपालिका मुख्य कार्यालयाचे समोरील प्रांगणात सकाळी ०९.४५ वा. छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळयास व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्धाकृती पुतळयांस पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम आयोजित केला आहे.

तसेच महानगरपालिका मुख्य कार्यालय दुसरा मजला येथे सकाळी ठिक १०.०० वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस **मा. महापौर सौ. ज्योत्स्ना जालिंदर हसनाळे** यांचे शुभहस्ते पुष्पहार अर्पण करण्यांत येणार आहे.

तरी सदर कार्यक्रमास आपण आपल्या अधिनस्त कर्मचाऱ्यांसह उपस्थित रहावे. जे अधिकारी/कर्मचारी उपस्थित रहाणार नाहीत त्यांचेवर नियमानुसार कारवाई केली जाईल याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**(संभाजी वाघमारे)**
**उपायुक्त (मु.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति,**

--------------------------

--------------------------

--------------------------